**FREDUN PHARMACEUTICALS LIMITED**

*Compassionate Healthcare*

**CIN No :** L24239MH1987PLC043662

October 29, 2018

To,
**BSE Ltd.,**
Listing Department,
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street - Fort,
Mumbai – 400 001

Ref.: BSE Scrip Code - 539730

**Subject: Newspaper Advertisement of the Board Meeting**

Dear Sir / Madam,

In compliance to Regulation 47 of SEBI Listing Regulations, 2015; we enclose herewith the copies of the Notice of the ensuing Board Meeting of the Company scheduled to be held on Monday, November 5, 2018; published in Navshakti & Free-press Journal on October 28, 2018.

Kindly take the same on your Records.

Thanking you,

For **Fredun Pharmaceuticals Limited**

**Dr. (Mrs.) Daulat Medhora**
**Jt. Managing Director**

FREDUN PHARMACEUTICALS LTD. MUMBAI

**Encl. - A/a**

**Office Address:** Manoj Industrial Premises, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031, (INDIA)
**Factory Address:** 14,15,16, Zorabian Industrial Complex, Vevoor, Palghar ( E), Dist: Palghar - 401 404.
Phone: 91-22-4031 8111 Fax: 91-22-4031 8133 E-mail: business@fredungroup.com Web: www.fredungroup.com

# माजी महापौर वैजयंती घोलप यांचे नगरसेवकपद अखेर रद्द!

## पालिका आयुक्त गोविंद बोडके यांनी केली कारवाई

**वार्ताहर**

कल्याण, दि. २७ - कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शिवसेनेच्या माजी महापौर आणि विद्यमान नगरसेविका वैजयंती गुजर-घोलप यांचे नगरसेवक अखेर रद्द करण्यात आले आहे. जात प्रमाणपत्र जातवैधता पडताळणी समितीने रद्द केल्याने पालिका आयुक्त गोविंद बोडके यांनी याची दखल घेत वैजयंती गुजर घोलप यांचे नगरसेवकपद रद्द केले आहे. वैजयंती गुजर घोलप यांनी या खोट्या जात प्रमाणपत्राच्या आधारे पालिकेची फसवणूक केल्याने याची नुकसान भरपाई त्यांच्याकडून करण्याची मागणी याचिकाकर्ते गौरव गुजर यांनी केली आहे.

माजी नगरसेविका वैजयंती गुजर घोलप यांनी रामबाग खडक प्रभागातून निवडणूक लढवली होती. हा प्रभाग ओबीसी साठी राखीव होता. त्यांनी आपण इतर मागास प्रवर्गातील धनगर जातीचे असल्याचा जात प्रमाणपत्र दाखल करत या प्रभागातून निवडणूक लढवली होती, मात्र घोलप या ओबीसी जातीच्या नसून त्या खाटीक जातीच्या असून ही जात एसटी प्रर्वगात येत असल्यामुळे त्यांच्या ओबीसीच्या जात प्रमाणपत्राला त्यांच्या प्रभागातून निवडणूक लढवणाऱ्या भाजपचे उमेदवार गौरव गुजर यांनी न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायालयाने त्याचे जात प्रमाणपत्र वैध नसल्याचे स्पष्ट केले होते, मात्र न्यायालयाच्या निर्णयाला घोलप यांनी जात वैधता पडताळणी समितीकडे आव्हान दिले होते. या समितीने आपल्या पुराव्याची योग्य प्रकारे उलटतपासणी करून निर्णय देण्याची मागणी त्यांनी केली होती. या प्रकरणी वैजयंती गुजर आणि गौरव गुजर यांनी अनेक पिढ्याची जात प्रमापत्र सादर केली होती. या सर्व कागदपत्रांची तपासणी केल्यांनातर पडताळणी समितीने आपला निर्णय जाहीर करताना वैजयंती गुजर घोलप यांचे जात प्रमाणपत्र रद्द ठरवले आहे.

हा अहवाल पालिका आयुक्तांना प्राप्त होताच या अहवालाची दखल घेत पालिका आयुक्तांनी वैजयंती गुजर घोलप यांचे नगरसेवकपद रद्द करण्याची कारवाई केली आहे. यामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, वैजयंती गुजर घोलप यांनी खोटे जात प्रमाणपत्र सादर करत पालिकेची फसवणूक केली असून त्यांनी आतापर्यंतच्या कालावधीत पालिकेच्या ज्याकाही सोयीसुविधा आणि मानधन घेतले आहे, त्याची नुकसान भरपाई त्यांच्याकडून करण्याची मागणी गौरव गुजर यांनी केली आहे.

# रबाळे आणि तुर्भे येथे झालेल्या अपघातांत दोघांचा मृत्यू

नवी मुंबई, दि. २७ (वार्ताहर) - ठाणे-बेलापूर मार्गावर महापे येथे तसेच रबाळे येथील गोठीवली गावात गत बुधवारी घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या अपघात प्रकरणी पोलिसांनी वाहन चालकांवर गुन्हे दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

ठाणे-बेलापूर मार्गावर बुधवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या पहिल्या अपघातात ठाण्याहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या आयशर टेम्पोवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो पुढे जाणाऱ्या ट्रेलरवर धडकला. या अपघातात टेम्पोतील गणेश हणमंत हलबर्गे (१७) हा गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मृत पावला. तर त्याचे सहकारी मंजुशा शिवलिंग स्वामी (२०) आणि शिवलिंग रामप्पा स्वामी (२७) हे दोघे जखमी झाले. त्यांना वाशीतील महापालिकेच्या रुग्णालयात


**ओरिएन्टल अॅरोमॅटिक्स लिमिटेड**
(याआधी कम्फोर अॅन्ड अलाईड प्रॉडक्टस लि.)
नोंदणी. कार्यालय: १३३, जहांगीर इमारत, २ रा मजला, एम.जी.रोड, मुंबई-४००००१

**सूचना**

सेबी (एलओडीआर) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७(१) च्या तरतुदींनुसार सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या मंडळाची सभा ही ३० सप्टेंबर, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवर्ष करिता कंपनीच्या अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारत आणि मंजूर करण्यासाठी सोमवार, ५ नोव्हेंबर, २०१८ रोजी नोंदणीकृत कार्यालय१३३, जहांगीर इमारत, २ रा मजला, एम.जी.रोड, मुंबई-४००००१ येथे घेण्यात येणार आहे.

सदर माहिती कंपनीची वेबसाईट www.camphorallied.com वर आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट www.bseindia.com वर उपलब्ध आहे.

ओरिएन्टल अॅरोमॅटिक्स लिमिटेड करिता
सही/-
धर्मिल ए. बोदानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण: मुंबई
दिनांक: २६.१०.२०१८



**caprihans** INDIA LIMITED

सीआयएन:एल२९१५०एमएच१९४६ पीएलसी००४८७७
नोंदणी कार्यालय: ब्लॉक डी, शिवसागर इस्टेट, डॉ. अॅनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८.
ईमेल आयडी : cil@caprihansindia.com
संकेतस्थळ : www.caprihansindia.com
टेलिफोन : ०२२ २४९७८६६०

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ सहवाचता रेग्युलेशन २९ अन्वये कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ३० सप्टेंबर, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही करिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात घेऊन आणि मंजूर करण्यासाठी शुक्रवार, दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ रोजी घेण्यात येणार आहे.

सदर सूचना कंपनीचे संकेतस्थळ म्हणजेच www.caprihansindia.com आणि स्टॉक एक्सचेंजचे संकेतस्थळ www.bseindia.com यावरही उपलब्ध असणार आहे.

कॅप्रिहन्स इंडिया लि. करिता
के. आर. विश्वनाथन
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक : २६ ऑक्टो., २०१८



**फ्रेडन फार्मास्युटिकल्स लिमिटेड**
सीआयएन : एल२४२३९एमएच१९८७पीएलसी०४३६६२
नोंदणीकृत कार्यालय : २७, मनोज इंडस्ट्रियल प्रिमायसेस, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई - ४०००३१, फोन क्रमांक : + ९१ २२ ४०३१८१११, फॅक्स : + ९१ २२ ४०३१८१३३,
ईमेल : business@fredungroup.com, वेबसाईट : www.fredungroup.com

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ च्या सहवाचता रेग्युलेशन ३३ अन्वये फ्रेडन फार्मास्युटिकल्स लिमिटेड ("कंपनी") च्या संचालक मंडळाची सभा अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांसह कंपनीच्या इतर बाबी विचारात आणि मंजुरीसाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजीस संपलेल्या तिमाहीकरिता सोमवार, दिनांक ५ नोव्हेंबर,२०१८ रोजी दु. ३.०० वा. कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय येथे घेण्यात येणार आहे.

वित्तीय निकाल, मंडळाच्या सभेत मंजूर झाल्यानंतर कंपनीचे संकेतस्थळ www.fredungroup.com त्याचबरोबर बीएसई च्या www.bseindia.com या संकेतस्थळावरही उपलब्ध असेल.

फ्रेडन फार्मास्युटिकल्स लिमिटेड करिता
सही/-
फ्रेडन मेधोरा
व्यवस्थापकीय संचालक आणि अनुपालन अधिकारी

दिनांक : ऑक्टोबर २७,२०१८
स्थळ : मुंबई



बँक ऑफ इंडिया BOI
Bank of India
Relationship beyond banking

**कांदिवली शाखा**
८८, डॉ. दळवी एक्स रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०६७
दूर. : ०२२-२८६४ ६९६७/२८६१९४०२, फॅक्स : ०२२-२८०५४७९४,
ईमेल : kandivali.mumbainorth@bankofindia.co.in

(नियम ८(१)) **कब्जा सूचना**

*(स्थावर मिळकतीकरिता)*

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (क्र. ३ सन २००२) आणि कलम १३ (१२) सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक १५.०५.२०१८ रोजी मागणी सूचना जारी करून आणि दि. ०५.०८.२०१८ रोजी फ्री प्रेस जर्नल आणि नवशक्ति या दैनिकांमध्ये प्रकाशित करून कर्जदार/हमीदार मे. श्री कृष्णा ट्युब ट्रेडर्स, श्री. हितेंद्र पी. भगत, श्रीम. केतकी एस. भगत, श्री. हरिष कुमलदास शहा, श्री. निरांजन कुमनदास शहा यांस सूचनेतील एकूण नमूद रक्कम म्हणजेच रु. ४,६७,३२,४८५.४८ पै. (रुपये चार करोड सदुसष्ट लाख बत्तीस हजार चारशे पंच्याऐशी आणि अठ्ठेचाळीस पैसे मात्र) ची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार/हमीदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार, हमीदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर अॅक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदर नियमावलीच्या नियम ८ अन्वये २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी घेतला आहे.

